# राशिभविष्य - जून, २०१६ .

दादा दामले(dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध आर्थिक समस्यांमुळे व कौटुंबिक वाद, भांडणामुळे मनस्ताप देणारा असाच सिद्ध होईल. वाढता खर्च , आर्थिक फसवणूक, वित्त हानी, अनारोग्य अशा कारणांमुळे त्रस्त व्हाल. काही मंडळीना बेअब्रूच्या - जिवावरच्या - प्र संगाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता जाणवते. जपा. अकारण शत्रुत्व निर्माण होणेही संभवते. जपा. पण प्रिय जनांच्या सहयोगामुळे मनस्ताप सहन करणे शक्य होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व सुखदायक होईल. काही मंडळीना बढती, काहीना पगारवाढ, तर काहीना एखादे मानाचे स्थान मिळणेही संभवते. मात्र हितशत्रूचा त्रास होणेही संभवते. जपा. तसेच कुमार्गी मित्रांचा त्रास होणेही शक्य दिसते. जपा. कमिशन, दलाली वर व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीकरणे शक्य होईल. राहूमुळे या राशीच्या मंडळीच्या संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या वक्री शनि-मंगळ ग्रहांमुळे उषणता विकार व वातविकारांनी अनारोग्य होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे , गैरसमज, वाद आदी कारणांनी वैवाहिकजीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, गैरसमज आदी कारणानी भागीदारीत बाधा येणार नाहीयाची काळजी घ्यावी. श्रीगणेश उपासना मन:शांती देईल.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळीना या संपूर्णमहिन्याचा काळ प्रतिकुलअसल्याचाच अनुभव येईल. त्यामुळे त्यांनी मन व विचारशक्ती स्थिर व शांत राखण्याचा प्रयत्न करावा आणि सहनशील बनून या प्रतिकुल काळाशी मुकाबला करावा. तेच सुखाचे होईल. आहे तो नोकरी-व्यवसाय सोडण्याचा व नवीन काही करण्याचा विचारही करू नये. हटवादीपणा कराल तर स्वत:चेच नुकसान होईल. नंतर पश्चात्ताप करण्यात काय अर्थ आहे ? आर्थिक फसवणूक होणे संभवते. जपा. असह्य मनस्तापामुळेच शारीरिक अनारोग्य होणे संभवते. जपा शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकारांचा त्रास होणे

संभवते. नेत्रविकार , घसा, दाढा, मान दुखणे अशापैकी आजार होणे संभवते. मित्रांशी वितुष्ट येणे, कुसंगतीची बाधा होणे, त्यामुळे अर्थहान ीहोणे शक्य दिसते. जपा. अशा प्रतिकुल काळातही शुक्र ग्रहाच्या अल्प प्रमाणातील सहयोगामुळे मधूनमधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक सुखात विविध कारणानी बाधा येईल व त्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. नातेवाईक मंडळीपासून त्रास होणे संभवते. जपा. अशाही परिस्थितीत जन्मकुंडलीत योग असतील तर काही मंडळीना स्थावर खरेदी-विक्रीच्या व्यवहारातून धनलाभ होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हर्षल ग्रह या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर खूपच मनस्तापदायक घटना घडण्याची शक्यता दिसते. निराश, उदास न होता खंबीर मनाने परिस्थितीशी मुकाबला करा. अपप्रचाराचा त्रास होणे संभवते. केवळ मानसोपचार तज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांनाच फक्त या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरवर्गाला या महिन्याचा काळ अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. त्यामुळे मनस्ताप सहन करावा लागेल. सतत मनाविरुद्ध घटना घडतील. आर्थिक चिंता त्रस्त करतील. त्यामुळे काही मंडळीना नैराश्य येईल. पण मन व विचार स्थिर राखू शकलात व सहनशील बनून काळव्यतीत एलात तर फारसा त्रास होणार नाही. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र , राजकारण अशापैकी व्यवसाय असणाराना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात परिस्थितीची अनिश्चितता अनुभवास येईल. त्यावेळी मित्रांशी वाद भांडणे होणे संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या गुरु-राहूमुळे भावंडस ुखातबाधा येऊ शकेल. पण काहीना प्रवासयोग येतील तर या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणेही शक्य आहे. या राशीच्या षषठ स्थानी असलेल्या वक्री शनि-मंगळामुळे उष्णताविकार व वातविकारांनी अनारोग्य होणे संभवते. पण अनुक्रमे वकिली व्यवसाय, यांत्रिक तांत्रिक व्यवसाय, औषधविक्रेते , लोखंड व कोळसा व्यापारी यांना काही प्रमाणात अनुकुल होतील. मात्र हाच मंगळ महिन्याच्या उत्त रार्धात या राशीच्या पंचम स्थानी जाईल तेव्हा संततिसमस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या केतूमुळेही संततिविषयक समस्या मनस्ताप देईलसे वाटते. पण भाग्यस्थानी असलेल्या

नेपच्यूनमुळे अध्यात्मिक उपासनेत प्रगती होईल व काहीना सूचक स्वप्ने पडतील. तसेच काही मंडळीना परदेशगमनाचे योगही येतील. कुलदैवताची उपासना अनुकुल होईल.

(४) **कर्क** - या राशीच्या या महिन्याच्या कुंडलीत राहू व गुरु हे परस्पर विरोधी परिणाम घडविणारे दोन ग्रह धन व कुटुंब स्थानी असल्याने होणारे परिणाम सर्वसामान्य असेच असण्याची शक्यता वाटते. गुरूमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील, तर राहूमुळे कुटुंबात कलह, भांडणे होणे संभवते. गुरूमुळे अर्थप्राप्ती संभवते, तर राहूमुळे आर्थिक संकटे येण्याची शक्यता दिसते. त्यामुळे जमा व खर्च समसमान झाल्यास फारसा मनस्ताप होणार नाही, असे वाटते. या राशीच्या प्रत्येक व्यक्तीच्या जन्मकुंडलीतील योगानुसार लाभ-हानी अवलंबून राहील. या राशीच्या नोकरदार मंडळीना व स्वतंत्र व्यवसाय असणारांना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक असणार आहे. त्यामुळे त्यांनी जे काय साधावयाचेते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या काहीमंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहीना परदेश गमनाचे योग संभवतात. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या नेपच्यून व केतूमुळे अनारोग्य व पाण्यापासून व विषापासून धोका संभवतो. जपा. केतूमुळे काही मंडळीना त्वचारोगाचा, तर काहीना रक्तविकाराचा , मुखदंत रोगाचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. तसेच या केतूमुळे वैवाहिक सुखातही बाधा येणे संभवते. जपा. शिवाय अपघात भय आहेच. जपा. वक्री शनि-मंगळ कौटुंबिक व संततिविषयक सुखात बाधा आणण्याची शक्यता दिसते. शिवोपासना अनुकुल होईल.

(५) **सिंह** - या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात आपल्या अहंकारी स्वभावावर नियंत्रण ठेवले तरच सुखाचे होईल. नपेक्षा स्वत:च अपमानित व्हाल. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना, चिकित्सक बौद्धिककार्यक्षेत्र असणारांना , साहित्यिकांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या वक्री शनि-मंगळ ग्रहामुळेविविध कारणांनी गृहसौख्यात बाधा येणे संभवते. काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहीना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील जपा. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ ग्रह वक्र गतीने या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर परिस्थिती काही प्रमाणात

सुधारेल. नोकरीत वरिष्ठ अधिकारी तुमच्या कर्तृत्वाचे कौतुक करतील. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या केतूमुळे व नेपच्यूनमुळे वैवाहिकजीवनातील सुखात बाधा येणे संभवते. आपल्या अहंकारी व अधिकारशाही स्वभावावर नियंत्रण ठेवलेत तर खूपच सुखाचे होईल. ज्यांची कोर्ट प्र करणे आहेत त्यांनी ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलमुळे घरीदारी कोठेही अपघात होण्याची शक्यता असते. म्हणून सतत सावधानतेने आचरण करा. विचाराच्या तंद्रीत चालू नका, वाहन चालवू नका. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हाच हर्ष ल भाग्यस्थानी गेल्यावर काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रग तीस काळ अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर नियमितपणे दररोज आपल्या प्रिय दैवताची उपासना करा.

**(६) कन्या** - या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा पूर्वार्ध खूपच प्रतिकुलअसल्याचा अनुभव येईल. मानसिक ताण, घरी वडील मंडळीचा विरोध व नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. काही मंडळीना मानहानी तर काहीना पदभ्रष्टतेचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसेते. जपा. त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या काही मंडळीना उगीचच एखादी आजार भावना त्रस्त करील. काहीना काल्पनिक चिंतेचा त्रास होणे संभवते. तसे पाहिले तर शारीरिक आरोग्य उत्तम राहू शकेल; पण मानसिक त्रास मात्र सहन करावा लागेल. अध्यात्मात रस असणारांना व समाजसेवेची आवड असणारांना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व सात्विक सुखशांती देणारा असा सिद्ध होईल. महिन्याच्या उत्तरा र्धात परिस्थिती सुधारेल. नोकरदार मंडळीना काळ सुखदायक असल्याचा अनुभव येईल. इच्छा आकांक्षा काही प्रमाणात पूर्ण होतील. मोठ्या लोकांच्या ओळखीतून काही लाभदायक घटना घडतील. अर्थलाभ होणे संभवते. काहीना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या युवकांना नवे कार्यक्षे त्र मिळू शकेल. काहीना अपेक्षित अशी उत्तम नोकरी मिळेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात वक्री मंगळ या राशीच्या धनस्थानी गेल्यावर शारीरिक उष्णता भडकून अनारोग्य होणे संभवते. हर्षलमुळे वैवाहिक जीवनातील सुखात व भागीदारी व्यवसायात बाधा निर्माण होणे संभवते. जपा. श्रीगु रुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे दररोज नियमितपणे पठण करा.

(७) तुळा - शनि ग्रहाच्या साडेसातीचा केवळ आठ मिहिन्याचा काळ शिल्लक राहिला आहे. तेव्हा या महिन्याच्या काळात विविध कारणानी शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. नियोजित कार्यात अडथळे येणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे, कुटुंबात अनिष्ट घटना घडणे, संततिसमस्या निर्माण होणे, या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होणे अशापैकी मनस्ताप सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. मनावर, विचारशक्तीवर व स्वभावावर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून तसेच नम्रतेचे आचरण करून प्रतिकुल काळाशी मुकाबला करा. तेच सुखाचे होईल. या राशीच्या काही मंडळीना पोटविकाराचा तर काहीना डोकेदुखीचा किंवा मेंदू विकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. स्वत:च्या अनारोग्यासोबत कुटुंबातील इतरांच्या आजाराची जबाबदारीही सहन करावी लागेल. तुळा राशी ही वायुतत्वाची बौद्धिक राशी आहे. गूढ संशोधानास अनुकुल राशी आहे. त्यामुळे चिकित्सक बौद्धिक आणि शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना काळ अनुकुल. प्रगतिकारक व यशदायक होईल. पण बुद्धीला फाजील ताण देऊ नका. हाच हर्षल त्या दृष्टीने प्रतिकुल आहे. या राशीच्या इतर नोकरदार मंडळीना विरोधी परिस्थितीशी मुकाबला करतच काळ व्यतीत करावा लागेल. जपा. अशा प्रतिकुल काळात गुरु-शुक्र ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधू मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

(८) वृश्चिक - शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असून या राशीच्या मंडळीना वक्रीशनि -मंगळ हे दोन्ही ग्रह सध्या प्रतिकुल आहेत. त्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. जपा. आपल्या संतापी, चंचल, उतावळ्या स्वभावावर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून या प्रतिकुल काळाशी मुकाबला करा. तेचसुखाचे होईल. हटट व जिद्द कराल व हेकट, उद्धट आचरण कराल तर स्वत:चेच नुकसान करून घ्याल. अकारण श्रम , दगदग करू नका. त्यामुळे शारीरिकउष्णता भडकून उष्णता विकार बळावतील व आरोग्य बिघडेल जपा. महिन्याच्या उत्तरार्धात अधिकच मनस्ताप होणे संभवते. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य त्रास सहन करावा लागेल. जपा. आर्थिक चिंता त्रस्त करतील. गैरसमजुती, भांडणे यांनीत्रस्त व्हाल व कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. विषभय असल्याने बाहेरचे पदार्थ शक्यतो खाऊ नका. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय

संशोधन कार्यक्षेत्र असणारांना, तसेच वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना व कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काहीना डोकेदुखीचा तर काहीना मेंदूविकाराचा त्रास होणे संभवते. जपा. या राशीच्या अन्य नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकूल असल्याचाच अनुभव येईल. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे व अन्य कारणानी वैवाहिक सुखात बाधा येणे संभावते. मन:शांतीसाठी श्रद्धेने श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा.

**(९) धनु** - या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी नोकरीत जे काय साध्य करावयाचे आहे ते पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र , शास्त्रीय संशोधन क्षेत्र , वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, औषध विक्रेते यांना महिन्याचा उत्तरार्ध व विशेष करून महिन्याचा अखेरचा सप्ताह अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना मूल्यवान वस्तूचा लाभ होणे संभवते. तसेच या राशीच्या कल्पक कलाकार मंडळीच्या कलेचे कौतुक होईल. स्त्रियांना आवश्यक वस्तूंचा व्यापार असणारांना काळ लाभदायक होईल. अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना उपासनेद्वारे सुख-शांती समाधान लाभू शकेल. त्यासाठी काळ अनुकुल आहे. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या तर काहीना परदेशवारीची संधी मिळेल. ज्यांची प्रेमप्रकरणे असतील त्यांना महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात सफलतेचा आनंद होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. पण परिस्थिती कशीही असली तरी स्वाभाविक दोषामुळे आहे त्यात सुख लाभणार नाही, कोणाशी पटणार नाही, कोणी उपदेश केला तर चालणार नाही. त्यामुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येईल. जपा. तसेच महिन्याच्या उत्तरार्धात स्वत:चे वा जीवनसाथीचे अनारोग्य, मतभेद, वाद आदी कारणांनी वापेक्षित वैवाहिक जीवनातही बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे दररोज नियमितपणे पठण करा.

**(१०) मकर-** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. तसेच यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय,

औषधविक्रेते , उच्च चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र वा नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना सुद्धा महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक समस्या त्रस्त करतील. जपा. महिन्याचा दिनांक २६ पर्यंतचा काळ कौटुंबिक व गृहसौख्याच्या दृष्टीने समाधानकारक जाईल. पण शेवटच्या सप्ताहात अस्वस्थ मनस्थितीमुळे काही केले तरी सुखसमाधान लाभणार नाही. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत वरिष्ठांचा रोष सहन करावा लागेल. प्रिय जनाच्या दूरत्वामुळेमन अस्वस्थ होईल. शिवाय मुलांपैकी कोणाच्या आजारपणाची समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. सावधानतेने सदैव आचरण करा. अपघात भय आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात ग्रहस्थिती सुधारेल. या राशीच्या अधिकार प्रकारची नोकरी असणारांना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह कटाक्षाने टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल तसेच ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचा योग आहे अशापैकी काहीना असा अचानक धनलाभ होणे संभवते. तसेच काहीना वारसाहक्काने धनलाभ होणेही शक्य दिसते. श्रद्धेने दररोज नियमितपणे श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा. हनुमानचालीसा स्तोत्राचे पठण करा.

(११) **कुंभ** - या राशीच्या मंडळीना या संपूर्ण महिन्याचा काळ फारसा अनुकुल नसल्याचेच दिसते. त्यामुळे त्यांनी मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवूनच व सहनशीलतेचे आचरण करूनच या माहिन्याचा काळ व्यतीत करावा, असे सांगावेसे वाटते. या काळात या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत कोमल राहण्याची शक्यता दिसते. तसेच मानसिक संवेदनाही अतिशय शीघ्र असतील. त्यामुळे मनासारखे थोडेही घडले नाही तर लगेच उदासीनता येईल व त्यातूनगहरे नैराश्य येणे संभवते. जपा. मनस्थिती अस्थिर, चंचल होणार असल्याने अविचाराचे आचरण होणे शक्य आहे. तसेच स्वभावही अस्थिर, चंचल, लहरी झाल्यास हातून काहीही घडू शकेल जपा. पालकांनी या राशीच्या लहान मुलांकडे विशेष लक्ष द्यावे. त्यांचा हूडपणा, व्रात्यपणा नको ते घडवील. जपा. वाहन अपघात योग संभवतो. सावधानतेने सतत आचरण करा. धनस्थानी असलेल्या हर्षलमुळे अविचाराचे आचरण होणे संभवते. जपा. जिभेला लगाम घाला. नपेक्षा आपल्या फटकळ बोलण्याने माणसे दुखावली जातील. पण हा हर्षल महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या तृतीय स्थानीगेल्यावर उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, शास्त्रीय

संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री - ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. नोकरदार मंडळीना नोकरीत प्रतिकूल परिस्थिती सहन करावी लागेल. कौटुंबिक सुख व गृहसौख्य तसेच संततिसुख मिळणे कठीण होईल. स्वत:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा अन्य कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. शिवोपासना करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीचा स्वभाव सध्या अतिशय अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असण्याची शक्यता जाणवते. कोणाचाही धाक वा सल्ला सहन होत नसावा असे वाटते. ज्यांची लहान मुले या राशीची असतील, त्यांनी मुलांकडे विशेष लक्ष याचे होईल. कारण सध्या या राशीची लहान मुले अत्यंत हूड व व्र ात्य होणे संभवते. जपा. विशेष करून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या मंडळीची मनस्थिती अत्यंत विचित्र होणे संभवते. त्यामुळ ेकोणी काही सांगितले तर लगेच फटकळपणे उत्तर देऊन समोरच्याचा अपमान होणेही शक्य आहे. जपा. तसेच अविचाराने खर्च होणेही संभवते. जपा. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. विशेष करून उच्च चिकित्सक बौद्धिक क ार्यक्षेत्र असणारांना व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना मात्र महिन्याचा अखेरचा सप्ताहच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या ज्या मंडळीचा परधर्मीय लोकांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे अधिक अर्थलाभ होणे संभवते. या राशीच्य ा मंडळीना दूरच्या प्रवासाचे वा परदेशगमनाचे योग संभवतात. पण शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात असह्य मनस्ताप सहन करावा लागण्या ची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुखात विविध कारणानी बाधा येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात वक्री मंगळ या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर शारिरीक उष्णता भडकून उष्णताविकारामुळे शारीरिक अनारोग्य होणे संभवते. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात ्रेयाची उपासना करा. तसेच शिवोपासनाही अनुकुल होईल.

=====ooo0ooo=====